MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात


बीड/प्रतिनिधी

बीड शहरातील नगरपरिषद माध्यमातून २० ते २२ काम त्याअगोदर मार्फत झालेली असताना तेच काम बी अँड सी मार्फत दिलेली दाखवून दोन कोटी रुपयाचा निधी हडपण्याचा डाव एमटी कंट्रक्शन करत आहे. गल्लीबोळातील बीड नगरपरिषद अंतर्गत हे काम या अगोदर झालेली आहे सिमेंट रोड नाल्या ह्या झालेल्या असताना सुद्धा बोगस पद्धतीने काम दाखवून पट्ट्यावरील रुपयांचा निधी मंत्रालयातून आणून त्याच रस्त्यावरती पुन्हा काम झाल्याचे दाखवून शासनाची फसवणूक करण्याचे काम एम टी कंट्रक्शन करून करण्यात येत आहे एमटी कंट्रक्शन हे भाजपाचे विद्यमान जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या बंधू मदन काका मस्के यांचे टेंडर आहे यावेळी अधिकारी बोलत आहेत की त्यांच्या टेंडरमध्ये कोणी हात घालू शकत नाहीत तो मस्के हा खूप मोठा माणूस आहे अशी चर्चा बी अँड सी मध्ये बोराडे भागवत अस सांगत आहेत. बीड तालुक्यातील अनेक भागातील अनेक कंट्रक्शनला बीड तालुक्यातील बोगस बीले उचलून देण्याची चंद्रकांत बोराडेची रविंद्र तोंडे अक्षय भागवत सह अन्य इंजिनियरची तयारीत.? बीड नगर परिषदेकडून नाहरक प्रमाणपत्र घेत दोन कोटीचे टेंडरचा घाट? बीड नगर परिषद कडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन कोट्यावधी रुपयांचे बीलं बी अँड सी मार्फत गुत्तेदाराच्या घशात घालण्याचे काम यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे चंद्रकांत बोराडे,रवि तोंडे,भागवत करत आहेत.


बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२६७ | गुरूवार दि.२० जुन २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -267 | THURSDAY DT. 20 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4


# टक्केवारीच्या अंधारात पालकमंत्री धनंजय मुंडे कलेक्टर दीपाताई मुंडे यांना काही दिसेना झाले?

## पंकजाताई मुंडे यांचा पराभव दोन कोटीच्या टेंडरमुळंच का भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के ने उत्तर द्यावं?







### हेच ते दोन कोटीचे टेंडरमुळं पराभव? खासदार प्रीतम ताई यांनी लक्ष देणे गरजेचे

- पंकजाताई मुंडे यांचा दोन कोटीच्या टेंडर मुळंच पराभव?
- बीड भाजप म्हणजे नवीन पर्व राजा मुन्ना देविदास सर्व ताई साहेबांना परवडले का?
- बीड विधानसभेतपा सहा हजारांनी ताईंचा पराभव म्हणजे
- एमटी कंट्रक्शन कार्यकर्त्यांचे काम चोरले म्हणून बीड विधानसभेतल्या भाजप कार्यकर्त्यांनी काम केलंच नाही?

- एमटी कंट्रक्शन ला दिलेले वीस कामाचे दोन कोटीचे टेंडर एकदा बीड शहरात कलेक्टर पालकमंत्री यांनी फिरून बघावं या अगोदर दुसऱ्या कंट्रक्शन कडून बीड नगरपरिषद नेते काम केलेला आहे संबंधित काम करत असताना बीड नगरपरिषद या अगोदर त्या प्रभागातील व गल्ली बोळातील काम करत
- कोट्यावधी रुपये त्याच वीस कामावर नाली रस्त्यावरती खर्च करून ते दोन कोटी एमटी कंट्रक्शन च्या घशात घालण्यापेक्षा शासनाने एमटी कंट्रक्शन चे ते दोन कोटीचे टेंडर रद्द करावे?
- सार्वजनिक बांधकाम विभागात तोंडे बोराडे भागवतांचा नंगानाच कलेक्टर पालकमंत्र्याला कधीच दिसत नाही ?
- बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे कलेक्टर दीपाताई मुंडे तुम्हाला जनतेच्या मनातील हिरो व्हायचं का झिरो व्हायचे?
- पंकजाताईच्या पराभवाला दोन कोटीचं टेंडर काम न करताच एम टी कंट्रक्शन पैसे घेण्याच्या तयारी धनु भाऊ हे टेंडर रद्द करा?
- पालकमंत्री धनंजय मुंडे आणि बीडच्या कलेक्टर दीपाताई मुंडे मुधोळ यांच्या डोळ्यात देखत दोन कोटी रुपये एमटी कंट्रक्शन उचलण्याचे प्रयत्न?
- एमटी कंट्रक्शन ने पाच ते सहा महिन्यापासून कामच सुरू केले नाही. कारण एमटी कंट्रक्शनला रस्त्यावर रस्ते नाल्या वर नाल्या दाखवून बोगस बिल उचलायचा आहे?

- एमटी कन्ट्रक्शनचे दोन कोटीचे टेंडर रद्द करा
- याच बीड शहरातील कार्यकर्त्यांच्या तोंडचा घास राजेंद्र मस्के मदन मस्के यांनी हिरावून घेतला?
- शंभर कोटी रुपयांचे बोगस बिल सार्वजनिक बांधकाम विभाग एक व दोन मधून गुत्तेदार पोसले पण धनु भाऊ,पंकजाताईंनी सर्व सामान्य कार्यकर्ता का नाही पोसला?
- बीड नगरपरिषद कडून ना हरकत प्रमाणपत्र घेत दोन कोटीचे टेंडर बी अँड सी कडून दोन कोटी लुटण्याचा घाट कोणाचा?
- तोंडे बोराडे भागवतकडून दोन कोटीचे बोगस बिल काढण्याची तयारी एमटी कंट्रक्शन कडून प्रक्रिया सार्वजनिक बांधकाम विभाग येथे सध्या चालू आहे.

### *संबंधित वार्ड गल्ली बोळातील प्रभागातील एकुण वीस*

*कामाची गुणवत्ता आणि निरीक्षण करूनच तोंडे बोराडे भागवत यांनी बिल अदा करावे आणि काम न करता जर बिल दिले तर तोंडे बोराडे यांना नक्कीच एम टी कंट्रक्शनच्या टक्केवारीमुळे फटका बसणार आहे कारण यावेळी तोंडे बोराडे आणि भागवत हे एम टी कंट्रक्शनला पोसण्याच काम करत आहेत. यावेळी तोंडे बोराडे आणि भागवत यांनी बीड तालुक्या सह अन्य ठिकाणी सुमारे १०० कोटी रुपयांचे बोगसबिले दिल्याची चर्चा सार्वजनिक बांधकाम विभाग एक व दोन च्या परिसरात ऐकायला मिळत आहे. तर भागवत तोंडे आणि बोराडे यांना सविस्तर माहिती विचारले असता ते म्हणत आहेत की शंभर कोटी रुपयांचे काम हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकर्त्यांचे आहेत. तर धनंजय मुंडें पंकजाताई मुंडे यांच्या कार्यकर्त्यांनी सुमारे ८० कोटी रुपयांचे काम आनल्याचेही यावेळी बोराडे भागवत यांच्याकडून ऐकायला मिळत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग एक व दोनला कोट्यावधी रुपयाचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग एक व दोनला मिळाला खरा परंतु आज सुद्धा बीड जिल्ह्यातील रस्त्याची नालीची व गल्लीबोळातील सिमेंट रोडची बीडच्या ग्रामीण भागातील डांबरीकरण केलेल्या रस्त्याची पाहणी केली तर अक्षरशा किती नंगा नाच या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रविंद्र तोंडे अक्ष भागवत चंद्रकांत बोराडे यांनी केलेला आहे. हे जनतेला नक्कीच दिसून येईल.*



बीड विधानसभेमध्ये दोन कोटीच्या टेंडर मुळे पंकजाताईंचा पराभव त्या २० कार्यकर्त्यांनी ताईचे काम केलेच नसल्याची चर्चा बीड शहरात हॉटेल टपरीवर रंगू लागल्या? याचं कारण एकमेव म्हणजे खा.डॉ. प्रीतम ताई मुंडे यांनी बीड शहरातील कार्यकर्त्यांना वीस काम हे दोन कोटीचा निधी उपलब्ध करून आणला होता. तर संबंधित निधी आणत असताना पंकजाताई प्रीतम ताई यांच्याकडून भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वीस कामाच्या टेंडर हे स्वतःचे म्हणजे एम टी कंट्रक्शन वरती घेतलं स्वतःचे भाऊ असलेले मदन मस्के यांच्या एम टी कंट्रक्शन वरती संबंधित २० कामाचे टेंडर बीड शहरातील घेतले खरे परंतु यावेळी मात्र नक्कीच प्रीतम ताई यांनी या कार्यकर्त्यांना शब्द दिला होता. की हे काम तुम्हाला आहेत? लोकसभेला आम्ही तुम्हाला काम देणार आहोत? असा शब्द यावी प्रीतम ताई यांनी दिला होता परंतु यात वेळी मदन मस्के राजेंद्र मस्के याचेबंधू आहेत. यांनी मात्र यावेळी हे टेंडर माझेद शेख यांच्या कंट्रक्शन वरती पडलं माझेद शेख याना वापस घेण्यासाठी त्यांच्याकडून त्या कार्यकर्त्यांनी विनंती केली व संबंधित कार्यकर्ते हे शेख माझे साहेब यांच्याकडे गेले असता त्यांना विनंती करून त्यांना टेंडर मागे घ्यायला लावले शेख माझेद साहेब यांनी ही गरीब कार्यकर्त्यांना काम मिळत आहेत म्हणून टेंडर परत घेत आहे. असा शब्द देत माझेद कंट्रक्शननी पत्र दिले. आणि माघार घेतली. परंतु यावेळी राजेंद्र मस्के भाजपचे जिल्हाध्यक्ष यांचे बधूचे एमटी कंट्रक्शनने टेंडर घेऊन सहा महिने होत आहे. पाच ते सहा महिन्यापासून संबंधित काम न करता बिल उचलण्याची घाई यावेळी एमटी कंट्रक्शन कडून करण्यात येत आहे. परंतु यावेळी बीड शहरातील वेगवेगळ्या वीस काम असलेले गल्लीबोळातील प्रभागातील वार्डातील लोक सांगत आहेत. की संबंधित काम हे बीड नगरपरिषद ने या अगोदरच वेगवेगळ्या म्हणजेच सिताई कंट्रक्शन च्या माध्यमातून संबंधित बीड शहरातील काम झालेले आहेत. या वरती एमटी कंट्रक्शन ने रस्त्यावर रस्ते आणि नालीवर नाली दाखवून फक्त कागदावरच दोन कोटी रुपये निधी उचलण्याचे काम यावेळी एमटी कंट्रक्शन कडून भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे भाऊ मदन म्हस्के व एम टी कंट्रक्शन करत आहे.? तर यांना पोसण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे रवींद्र तोंडे चंद्रकांत बोराडे अक्षय भागवत हे त्यांना प्रोत्साहन देऊन संबंधित गल्लीबोळातील नाली रस्त्याचे बोगस पद्धतीने एनोस्या देऊन बिल अदा करण्याची तयारी आहे. एकूण वीस कामाच्या चौकशी ह्या पालकमंत्री व कलेक्टर यांनी स्वतः रस्त्यावर उतरून करावे तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे तोंडे बोराडे भागवत यांनी संबंधित काम पाहून बिल द्यावे कारण त्यामध्ये वीस कामापैकी तीन ते चारच काम हे करायचे आहेत बाकी सर्व म्हणजे एकूण १५ ते १७ काम बीड शहरातील वेगळ्या कंट्रक्शन बीड नगरपरिषद मार्फत ते काम केलेले आहेत व नंतर त्याचे बिल द्यावे अन्यथा यावेळी सामाजिक कार्यकर्ते रस्त्या उतरणार आहेत. तर यावेळी संबंधित कामाची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत धाराशिवचे सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ यांना तक्रारी केली आहे. पालकमंत्री कलेक्टर यांना खरंच टक्केवारीच्या अंधारात काही दिसत नाही का असाल सवाल बीड करांच्या वतीने करण्यात येत आहे? बीडची जनता ही पालकमंत्री धनंजय मुंडे यांना हिरो आणि कलेक्टर यांनाही हिरोस मानते परंतु या दोन कोटीच्या टेंडर मुळे पालकमंत्री व कलेक्टर यांनी हिरो व्हायचे का झिरो हे ठरवावे कारण याच दोन कोटीच्या टेंडर मुळे २० कार्यकर्त्यांनी पंकजाताई मुंडे यांना प्रचारादरम्यान काम न केल्यामुळे भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडूनच पंकजाताई मुंडे यांचा पाच ते सहा हजार मतांनी पराभव झाल्याची चर्चा बीड शहरांमध्ये हॉटेल टपरीवर रंगू लागली आहे? माजी खा. डॉ. प्रीतम ताई मुंडे यांनी संबंधित दोन कोटी रुपयांचा निधी कार्यकर्त्यांसाठी आणला होता. परंतु भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व एमटी कंट्रक्शन त्यांचे बंधू मदन मस्के यांनी कार्यकर्त्यांना ते काम दिलेच नाहीत कार्यकर्त्यांमध्ये भर लोकसभेत पंकजाताई मुंडे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये संताप पंकजाताईंना महागात पडला असून पंकजाताईंना पाच ते सहा हजार मतांनी पराभव स्वीकारावा लागला या पराभवाला हेच दोन कोटी रुपयांचे एकूण वीस काम असलेले बीड शहरातील टेंडर हे एम टी कंट्रक्शन भरले होते. ह्या एम टी कंट्रक्शन वरती या कार्यकर्त्यांना माजी खा. डॉ. प्रीतम ताई मुंडे यांनी काम देण्याचा शब्द दिला होता.

# जलजिवनचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशाल सराफ यांचे जिल्हा परिषद कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू

## काहीही झालं तरी प्रश्न मार्गी लावणारच-विशाल सराफ

धारूर ।प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील गोपाळपूर ग्रामपंचायत अंतर्गत होत असलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या कामाची उच्चस्तरीय चौकशीसाठी व इतर प्रमुख सहा मागण्यासाठी विशाल सराफ यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कार्यालय बीड येथे आमरण उपोषण १९/६/२०२४ रोजी पासून सुरू झाले आहे.

धारूर तालुक्यातील गोपाळपूर ग्रामपंचायत मार्फत गोपाळपूर , संभाजीनगर,शिक्षक कॉलनी वडारवाडा या भागातील नागरिकांना जलजीवन मिशन अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईनचे काम गेल्या एक वर्षापासून सुरू असून सदर काम अद्याप पर्यंत कसल्याही प्रकारे पूर्णतत्त्वाकडे गेलेले नसून जल जीवन मिशन अंतर्गत नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे या हेतूने हर घर जल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून केंद्र शासनाच्या वतीने तीन कोटी एकोणनव्वद लाख चौथीत हजार नवशे रुपये खर्च करून गोपाळपूर ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या संपूर्ण वस्तीला शुद्ध पिण्याचे पाणी पुरवण्याच्या उद्देशाने करण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात अनागोंदी व भ्रष्टाचार करण्यात येत असून सदरील भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करून भ्रष्टाचार करणाऱ्या दोषीवर कारवाई करण्यासाठी व इतर प्रमुख सहा मागण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कार्यालय बीड येथे विशाल सराफ अमरण उपोषणास बसले आहेत.धारूर तालुक्यातील गोपाळपूर ग्रामपंचायत अंतर्गत होत असलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या कामाची उच्चस्तरीय चौकशीसाठी व किल्ले धारूर तालुक्यातील गोपाळपूर ग्रामपंचायत अंतर्गत होत असलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या कामाची उच्चस्तरीय चौकशीसाठी व( १)जलजीवनच्या कामाचे देयक रोखण्यात यावे(२) संबंधित इंजिनीअर अधिकारी व गुत्तेदारावर नियमानुसार कारवाई करा(




३)जलजीवन मिशन योजनेची चौकशी करण्यात यावी(४) पाइपलाइन इस्टिमेट प्रमाणे नसुन व एक मीटर खोलीकरण नसल्यामुळे संपूर्ण पाइपलाइन उकरून दाखवण्यात यावी(५) संबंधित कंट्रक्शनचे शासकीय लायसन्स रद्द करण्यात यावे(६) जलजीवनच्या पिण्याच्या पाण्याची टाकी दुसऱ्या जागेत बांधण्यात यावी, या मागण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कार्यालय बीड येथे आमरण उपोषणास बसले आहेत.सर्व मागण्या करून कारवाई होत नाही तोपर्यंत आम्ही माघे हटणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# बीड-नगर राज्य महामार्गावरील शिवशंकर ऑटोमोबाईल व टायर्स दुकान आगीत भस्मसात!

आष्टी ।प्रतिनिधी

बीड-नगर राज्य महामार्गावरील पिंपरी घाटा येथील एका ऑटोमोबाईल व टायर्स दुकानाला मंगळवारी रात्री पावणेबाराच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने आग लावणयाने दुकान जळून भस्मसात झाल्याची घटना घडली असुन यात दहा ते बारा लाखांचे नुकसान झाले आहे. आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा येथे बीड नगर राज्य महामार्गावर बंडू भागवत यानी नव्याने पत्र्याचे उभारलेले शिवशंकर ऑटोमोबाईल व टायर्स चे



दुकान आहे.मंगळवारी नेहमी प्रमाणे संध्याकाळी दुकान बंद करून घरी गेले.रात्री बाराच्या दरम्यान दुकानातून अचानक आगीचे लोळ बाहेर पडू लागल्याने त्यानी धाव घेतली असता आग आटोक्यात आणण्यात यश आले नसल्याने पुर्ण दुकान जळून भस्मसात झाले.यामध्ये वेगवेगळ्या कंपनीचे चारचाकी,दुचाकीचे नवीन टायर, ट्यूब,हवा भरण्याचे चार मशिन,ऑईल डबे यासह विविध साहित्य होते.अंदाजे आठ ते दहा लाखांचे नुकसान झाले आहे.ही आग कशाने लागली कि कोणी लावली हे अद्याप समजले नसले तरी कोणीतरी खोडसाळपणा करून आग लावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.


# लिपीक पदाचे काम करणाऱ्या परिचारीकेला जिल्हा स्तरीय प्रथम पुरस्कार

## पुरस्कार विकले जात असल्याचा संशय?

केज ।प्रतिनिधी

उपजिल्हा रुग्णालया हमेशा वादात असलेले रूगणालय म्हणून प्रसिद्ध होत आहे.फ्लोरेन्स नाईटिंगल पुरस्कार दिल्या नंतर पुन्हा हे रूगणालय वादात सापडल आहे.गेल्या तिन चार वर्षांपासून कॉमपिटर ऑपरेटर नसल्यामुळे जन्म दाखले देण्या साठी परिचारीचाला तिथे बसवले आहे कार्यालयीन कामात सकाळी ९ ते ५ असा डियुटी कालावधी असताना फक्त सकाळी १० ते १२ असे काम करतात ऐवढेच कमी ते काय अश्या परिचारीकेला केज उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकानी फ्लोरेन्स नाईटिंगल या शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पुरस्कारा साठी शिफारस केली व आश्चर्याची गोष्ट म्हणजे या परिचारीकेस जिल्या स्तरीय प्रथम पुरस्कार दिला गेला आहे.पुरस्कार देताना काही निकष असतात सगळ्या निकषाना पायदळी तुडवून हा पुरस्कार दिल्याने यात काही तरी काळेबेरे असल्याचे किंवा अर्थपूर्ण व्यवहारातून हा पुरस्कार दिल्याचे बालले जात आहे.

या बाबत वैद्यकीय अधीक्षक यांना विचारले असता ते सामाजिक संस्थेनी दिलेले पुरस्कार आहे असे खोटे सांगून आपणास वाचवत असल्याचे दिसून येत आहे तरी या फ्लोरेन्स नाईटिंगल पुरस्कार याची सखोल चौकशी करावी अशी केज उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी दबक्या आवाजात चर्चा करत आहेत.



# गेवराई शहरातील सीसीटीव्हीकॅमेरे म्हणजे शोभेची बाहुली

## या सीसीटीव्हीकॅमेऱ्यांच्या सुरक्षेसाठी लक्ष कोण देणार नगरपरिषद का पोलीस प्रशासन

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई : शहरातील मोठा गाजावाजा करून नगरपरिषदेमार्फत लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे जी गेवराई शहराची सुरक्षा व चोरांच्या चोरीपासून बचावासाठी गेवराई शहरात लावण्यात आले होते त्यामध्ये काही सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत गेवराई शहरामध्ये खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची भुरट्या चोरांपासून सुरक्षा व्हावी तसेच महापुरुषांच्या जयंती मध्ये अनुचित प्रकार घडू नये कायदा व सुव्यवस्थेला कुठेही तडा जाऊ नये तसेच रात्रीच्या जे चोऱ्या होतात त्या चोरांच्या मुसक्या आवळण्यासाठी व सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे त्या चोराची धुडघुस घालणाऱ्या पोरांची दंगलखोरांची ओळख पटवण्यासाठी पोलीस प्रशासनाला कामी येणारे हे सीसीटीव्ही कॅमेरे सध्या स्थितीमध्ये मरगळीला आले आहे गेवराई शहरातील कोणतेच सीसीटीव्ही कॅमेरे हे चांगल्या स्थितीमध्ये नाही नगर परिषदेसमोर शास्त्री पुतळ्याजवळचे सीसीटीव्ही कॅमेरे चे वायर तुटलेले आहे व रोडवर पडलेले आहे सरस्वती कॉलनी कडे जाणाऱ्या रस्त्यावरचे कॅमेऱ्याचे खांब वाकड्या स्थितीत आहे धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पाण्याच्या टाकीजवळ असलेले सीसीटीव्ही कॅमेरे चे वायर तुटलेल्या अवस्थेत आहे




अनेक ठिकाणी उन्हाच्या सावलीसाठी लावलेल्या पडद्यामुळे त्या कॅमेऱ्यामध्ये काहीच दिसत नाही तर काही ठिकाणी झाडांना मुळे कॅमेऱ्यामध्ये काही दिसत नाही सध्या शाळा सुरू असल्या कारनाणे लोकांची वर्दळ वाढलेली आहे यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे चालू असणे अत्यंत गरजेचे आहे नगरपरिषद प्रशासन तसेच पोलीस प्रशासन यांनी गेवराई शहराच्या सुरक्षेसाठी या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांकडे लक्ष घालून ते सीसीटीव्ही कॅमेरे चालू करून घ्यावेत जेणेकरून कोनताही अनुचीत प्रकार घडनार नाही कायदा व सुव्यावस्था आबाधीत राहील आसे नागरिकांन मधुन बोलले जात आहे

# पोलीस शिपाई पद भरती साठी मार्गदर्शक सूचना जारी

बीड ।प्रतिनिधी

राज्यभरात सुरू झालेल्या पोलीस शिपाई पद भरतीसाठी पोलीस प्रशासन दक्ष असून अपर पोलीस प्रशासनाने पावसाळ्याच्या तोंडावर होत असलेल्या पोलीस भरतीसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. पोलीस शिपाई पद भरतीस अनुसरुन राज्यात पोलीस शिपाई पदासाठी शारीरिक चाचणी दिनांक १९ जून २०२४ पासून सुरु करण्यात आली आहे. यासाठी काही उमेदवारांनी वेगवेगळ्या पदाकरीता एकापेक्षा जास्त ठिकाणी आवेदन अर्ज सादर केलेले आहेत. त्यांच्या शारीरिक चाचणीची वेळ एकाच दिवशी अथवा लगतच्या दिवशी आल्याचे दिसून आले आहे. अशा उमेदवारांना एकाच वेळी दोन पदाकरीता मैदानी चाचणी हजर राहण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी तारीख बदलून देण्याबाबत घटक प्रमुखांना सुचना देण्यात आल्या आहेत. अशा उमेदवारांना ते ज्या घटकात प्रथम हजर होतील त्या घटक प्रमुखांनी त्यांच्या प्रवेशपत्रावर सही व शिक्का नमूद करुन ते संबंधित घटकात शारीरिक चाचणीसाठी हजर होते असे अभिप्राय देण्यात यावे. तसेच, शारीरिक चाचणीस विहित वेळेत न पोहोचल्यामुळे कोणत्याही उमेदवारास अपात्र करण्यात येवू नये, त्यांना अन्य दिनांकास बोलावून त्याची शारीरिक चाचणी घेण्यात यावी. संबंधित उमेदवारास त्यांची ज्या घटकात दुसरी शारीरिक चाचणी आयोजित करण्यात आलेली आहे. त्या घटकांना ते प्रवेशपत्र दाखविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. जर घटक प्रमुखांना याबाबत काही शंका उद्भवल्यास संबंधित घटकाने त्याची यापुर्वी शारीरिक चाचणी झाली किंवा नाही हे दुरध्वनीद्वारे तपासून पहावे. पावसाळ्यात पोलीस भरती होत असल्याने मैदाने निसरडे होते अथवा वापरण्यास योग्य नव्हते याप्रकारचे आक्षेप येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन घटक प्रमुखांनी दरदिवशी मैदान वापरण्यास योग्य होते याबाबत क्रीडा अधिकारीत यांचे प्रमाणपत्र घ्यावे व मैदान सुस्थितीत होते याबाबतचे फोटो/व्हिडीओ पुरावा म्हणून जतन करुन ठेवावे. भविष्यात याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास अथवा विधीमंडळात प्रश्न उपस्थित झाल्यास या बाबीचा पुरावा म्हणून वापर करणे सोईचे होईल. पावसाळ्यामुळे मैदान वापरणे योग्य नसल्यास उमेदवारांना पुढील तारखेस बोलाविण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत सर्व उमेदवारांना समानतेची वागणूक मिळेल याची काटेकोरपणे दक्षता सर्व घटक प्रमुखांनी घ्यावी. असे आदेश पोलीस प्रशासनाने जारी केले आहेत.

# हाकेंच्या आंदोलनाविषयी सरकारने भूमिका जाहीरपणे स्पष्ट करावी , पंकजाताई मुंडेंची मागणी

ओबीसी नेते लक्ष्मण हाके व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाविषयी राज्य सरकारने आपली भूमिका जाहीरपणे स्पष्ट करावी, अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना पत्र पाठवत आपली मागणी केली आहे. लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी भेट देऊन त्यांचं म्हणण ऐकून घ्यावं, ही भेटही तेवढीच महत्वाची आहे, असं त्यांनी पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे.

पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे की, ओबीसी आरक्षणासंदर्भात लक्ष्मण हाके व त्यांचे सहकारी वडीगोद्री येथे गेल्या सात दिवसांपासून आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांच्या पोटात अन्नाचा कण नाही, त्यांनी पाणी देखील बंद केले आहे. शासनाची भूमिका ही सर्व आंदोलनांनासारखीच असली पाहिजे. हाके यांच्याबाबत प्रमुख मंत्र्यानी तसेच आपण स्वतः गांभिर्याने लक्ष तर द्यावेच याशिवाय उपोषणास भेट देऊन सन्मान द्यावा, त्यांचं म्हणणं ऐकून घ्यावं. ते अत्यंत संयमाने आणि सर्वांना सन्मानाने वागवत आहेत हे कौतुकास्पद आहे. त्यांचं आणि सर्व ओबीसी नेत्यांचं आवाहन देखील सकारात्मकच आहे.

कोणीही कुठल्याही प्रकारे नकारात्मक गोष्टी करू नयेत, कुठल्याही प्रकारची हिंसा करू नये असंच आवाहन ते करत आहेत म्हणजे व्यवस्थेचा सन्मानच करत आहेत. म्हणूनच त्यांच्याकडे तात्काळ लक्ष देणं तेवढंच महत्वाचं आहे. इथे प्रश्न समान न्यायाचा आहे, म्हणणे ऐकून कायद्याने निर्णय घ्यावा अशी आवश्यकता आहे. आपण व दोन्ही उप मुख्यमंत्र्यांनी सरकारच्या वतीने या आंदोलना विषयीची आपली भूमिका जाहीर स्पष्ट करावी



## लक्ष्मण हाके यांच्या पत्नी डॉ. विजयालक्ष्मी आणि मुलगा आदित्य याची आंदोलनस्थळी भेट

गेल्या सात दिवसापासून जालन्यातील वडीगोद्री येथे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके ओबीसी आरक्षणाच्या बचावासाठी उपोषण आंदोलन करत आहेत, आज या आंदोलन स्थळी लक्ष्मण हाके यांच्या पत्नी डॉक्टर विजयालक्ष्मी आणि मुलगा आदित्य यांनी हाके यांची भेट घेतली, यावेळी लक्ष्मण हाके काहीशे भाऊक झाल्याचं पाहायला मिळालं.

यावेळी हाके यांच्या पत्नी विजयालक्ष्मी हाके यांनी मराठा समाजाला स्वतंत्र दहा टक्के आरक्षण दिले तरी ओबीसी गटातून का आरक्षण हवंय असा सवाल करत परिवार म्हणून मला माझ्या कुटुंबाला आणि लक्ष्मण हाके यांच्या आई वडिलांना खूप काळजी वाटत असून सरकारने याकडे तातडीने लक्ष द्यावं अशी विनंती त्यांनी केली.



## प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाचा आज ७ वा दिवस

ओबीसी आरक्षणाला धक्का लावणार नाही असे सरकारच्या वतीने लेखी हमी दिल्याशिवाय माघार नाही या भूमिकेवर दोघेही ठाम आहेत. मागील २ दिवसांपासून तर पाणीही वर्ज्य केले होते मात्र आज उपस्थित सर्वांच्या आग्रहामुळे सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांच्या हस्ते पाणी प्राशन केले. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून ओबीसी बांधवांचे जथ्थेच्या जथ्थे येत आहेत. शासन स्तरावरून तातडीने दखल घेण्यास भाग पाडण्यासाठी हा ओघ आणखी वाढविण्याची गरज आहे. त्यामुळे तमाम ओबीसी बांधवांना नम्र विनंती आहे की जास्तीत जास्त संख्येने वडीगोद्री येथे सहभागी व्हावे.

यावेळी सावता परिषदेचे प्रदेशउपाध्यक्ष प्रविण गाडेकर, विभागीय अध्यक्ष शिवानंद झोरे, रामदास शेळके मामा, संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष विशाल पुंड, जालना जिल्हाध्यक्ष अजित बुलबुले, हिंगोली जिल्हाध्यक्ष विठ्ठल गाभणे, जालना युवा आघाडी जिल्हाकार्याध्यक्ष नंदू पुंड, युवा आघाडी सोलापूर अध्यक्ष सयाजी बनसोडे आदीजन होते.



# ‘आम्ही जरांगे’ मराठी चित्रपट शुक्रवारपासून प्रेक्षकांच्या भेटीला : डॉ. दत्ता मोरे

लातूर ।प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाचे लढवय्ये नेतृत्व मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनकार्यावर आधारित ’आम्ही जरांगे ’ गरजवंत मराठ्यांचा लढा हा मराठी चित्रपट येत्या शुक्रवारपासून, दि. २१ जूनपासून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. मराठी चित्रपट सृष्टीतील नामवंत कलाकारांच्या भूमिकांनी नटलेला हा चित्रपट रसिक प्रेक्षकांच्या पसंतीस नक्की उतरेल, असा विश्वास या चित्रपटाचे निर्माते डॉ. दत्ता मोरे यांनी लातुरात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

’ आम्ही जरांगे ’ चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या अनुषंगाने चित्रपटातील कलाकारांसह निर्माते डॉ. दत्ता मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मराठवाड्यातील प्रमुख शहरात या चित्रपटाचा मुख्य उद्देश समाजासमोर आणण्यासाठी प्रसार माध्यमांशी संपर्क साधून सुसंवाद केला. यावेळी निर्माते डॉ. दत्ता मोरे, डॉ. मधुसुदन मगर यांच्यासह मराठा समन्वयक श्याम वडजे, पडद्यावर जरांगे पाटील यांची भूमिका साकारणारे पृथ्वीराज थोरात, पुरूषोत्तम माने, लातूरचे डॉ. अभय कदम, विजय घाडगे, भगवान माकणे, विजय



औंढे, वैजनाथ जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांचे बालपण, तरुणपण आणि मराठा आंदोलन या तीन भूमिका सक्षमपणे पडद्यावर मांडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे सांगून डॉ. दत्ता मोरे म्हणाले की, या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी आम्ही ज्या - ज्या ठिकाणी गेलो, त्या- त्या ठिकाणी रसिक प्रेक्षक जरांगे पाटील यांच्यावर जीव ओवाळून टाकताना आढळून आले. जरांगे पाटील यांचा संपूर्ण अभ्यास करुन पृथ्वीराज थोरातसह तिन्ही कलाकारांनी त्यांचे वास्तव जीवन, मराठा आंदोलनाचा संघर्ष पडद्यावर साकारल्याचे त्यांनी सांगितले. छावा मराठा संघटनेचे नेते लातूरचे स्व. आण्णासाहेब जावळे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पहिला आरक्षण धडक मोर्चा काढला होता. लातूरकरांना आरक्षणाचा संपूर्ण इतिहास ज्ञात आहे. त्यामुळे लातूरकर या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद देतील. लातूरकर आण्णांना व जरांगे पाटलांना नक्कीच साथ देतील ,असा विश्वासही डॉ. मोरे यांनी व्यक्त केला. ह्या चित्रपटात राजकारण नसून समाजकारण आहे. हा चित्रपट तरूणांसाठी आहे. आपल्या उद्दीष्टांसाठी जगायचे, लढायचे. मरायचे नाही, हा चित्रपटाच्या निर्मितीमागचा मुख्य उद्देश्य असल्याचेही डॉ. मोरे यांनी सांगितले.

जरांगे पाटलांची भूमिका वठविणाऱ्या पृथ्वीराज थोरात यांनी यावेळी बोलताना आपणास सुरुवातीला थोडे दडपण आल्याची कबुली दिली. पण नंतर जरांगे पाटील यांचे व्हिडीओ पाहून आपण स्वतःला तयार केले. ही उर्जा आपणास छ. शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने मिळाली. मनोज जरांगे पाटील यांचे विचार घराघरात पोहचविण्याचा प्रयत्न आम्ही सर्वांनी या चित्रपटाच्या माध्यमातून केला आहे. हा चित्रपट पाहून तरुण आत्महत्या करणार नाहीत तर संघर्ष करून लढवय्ये बनतील, असा विश्वासही थोरात यांनी व्यक्त केला. या चित्रपटात मकरंद देशपांडे, प्रसाद ओक, सुबोध भावे, अजय पुरकर, कमलेश सावंत, विजय निकम यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.



# समग्र शिक्षा अभियांनांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

आष्टी ।प्रतिनिधी

समग्र शिक्षा अभियांनातर्गत मागील काळात अलिम्को मार्फत दिव्यांग मोजमाप तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात जिल्ह्यातील गरजू दिव्यांग विद्यार्थ्यांचे मोजमाप घेवून त्यांना त्या पद्धतीने साहित्य मंजूर झाले होते. तद्नुसार आष्टी तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना नुकतेच साहित्य वाटप करण्यात आले.

आष्टी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील १८ दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये व्हीलचिअर, रोलेटर, सि. पी. चिअर या साहित्यांचा समावेश आहे. दिव्यांग विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात यावेत व त्यांना चलनवलनास अडचण निर्माण होवू नये म्हणून त्यांना साहित्य मिळावे यासाठी आष्टी गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील विशेष साधन व्यक्ती देविदास शिरसाठ, गुणवंत मरेवार, विशेष शिक्षक बाळासाहेब काळे, मनोज यादव, निलेश वलवळे, शांतीलाल पानसरे हे सततच प्रयत्नशिल असतात.

याच उपक्रमांतर्गत जि. प. कन्या प्रशाला आष्टी येथील कु. श्रुतीका संतोष मंजुळे या विद्यार्थीनीला व्हिलचिअर देण्यात आली असून तिला साहित्य वाटप करतांना तिचे पालक संतोष मंजुळे, वर्गशिक्षिका अश्विनी धस मँडम, जयश्री सोळसे मँडम, राजेंद्र लाड, संतोष खंडागळे, शरद राऊत, विशेष साधन व्यक्ती देविदास शिरसाठ, गुणवंत मरेवार, आष्टी नंबर १ केंद्राचे विशेष शिक्षक बाळासाहेब काळे उपस्थित होते. व्हिलचिअर मिळाल्यामुळे कु. श्रुतीका च्या चेहऱ्यावर हसू दिसून आले. तिचे पालक संतोष मंजुळे यांनी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब खताळ व विशेष शिक्षक बाळासाहेब काळे यांचे विशेष आभार मानले.




लातूर ।प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षित होऊन आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाने इतरांनाही शिकवावे, शिक्षित करावे. स्वतःच्या उज्वल भवितव्याबरोबर राष्ट्र घडविण्याकामी मौलिक योगदान द्यावे, असे प्रतिपादन नूतन खासदार डॉ. शिवाजी बंडप्पा काळगे यांनी केले.

वीरशैव लिंगायत समाज लातूरच्या वतीने नुकतेच नूतन खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १०- १२ वी परीक्षेत ९० टक्क्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसह डॉक्टर, इंजिनिअर, वकील, फार्मसी, एमपीएससी, युपीएससीत नेत्रदीपक यश संपादन करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार शंभूलिंग शिवाचार्य महाराजांच्या दिव्य सान्निध्यात करण्यात आला. हा सत्कार सोहळा वीरशैव सांस्कृतिक सभागृहात पार पडला. त्यावेळी खा. डॉ. काळगे बोलत होते.यावेळी बोलताना खा. डॉ. काळगे यांनी आपण स्वतः राणी अंकुलग्याच्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेतल्याचे सांगितले. आजचा विद्यार्थी विज्ञान - तंत्रज्ञानाच्या काळात शिकतो आहे. त्यांना सर्व सोयी - सुविधा मिळत आहेत. विद्यार्थ्यांनी या सुविधांचा पुरेपूर फायदा घ्यावा. स्वतः शिकून दुसऱ्याला शिकवावे. आपल्या भविष्याबरोबर राष्ट्रही घडवण्यासाठी प्रयत्नशिल रहावे.

# आगीच्या ज्वाळांमध्ये पुस्तके जळतात पण ज्ञान मात्र कायम अबाधित राहते

## ऐतिहासिक नालंदा विद्यापीठाच्या नवीन कॅम्पसचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

राजगीर (वृत्तसंस्था)

नालंदा हे फक्त एक नाव नाही. ती एक ओळख आणि आदराचे ठिकाण आहे. नालंदा एक मूल्य आणि मंत्र आहे. केवळ भारताचाच नाही तर जगातील अनेक देशांचा वारसा नालंदाशी जोडला गेला आहे. नालंदा विद्यापीठाकडून असे शिकता येते की आगीच्या ज्वाळांमध्ये पुस्तके जळतात, पण ज्ञान मात्र कायम अबाधित राहत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

उत्तर प्रदेशच्या वाराणसीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी बिहारच्या दौऱ्यावर पोहोचले. पंतप्रधानपदाची सलग तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर मोदी पहिल्यांदाच बिहारला भेट देत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी बिहारच्या राजगीर मधील ऐतिहासिक नालंदा विद्यापीठाच्या नवीन कॅम्पसचे उद्घाटन केले. या उद्घाटन सोहळ्यात पंतप्रधानांसोबत बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमारही होते.

सकाळी नालंदा विद्यापीठात पोहोचलेल्या पंतप्रधान मोदींनी सर्वप्रथम विद्यापीठाच्या ऐतिहासिक वारशाची पाहणी केली. जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेल्या प्राचीन नालंदा विद्यापीठाच्या अवशेषांबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या पाटणा सर्कल प्रमुख गौतमी भट्टाचार्य यांच्याकडून माहिती घेतली. १६०० वर्षे जुन्या नालंदा विद्यापीठाला अखेर नवे रूप मिळाले आहे.नालंदा विद्यापीठात पोहोचण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या एक्स हँडलवर संदेश पोस्ट करून संदेश दिला होता. त्यांनी लिहिले की, ‘आमच्या शिक्षण क्षेत्रासाठी हा खूप खास दिवस आहे. नालंदाचा आपल्या गौरवशाली भूतकाळाशी खोल संबंध आहे. तरुणांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी हे विद्यापीठ निश्चितच पुढे जाईल.’‘तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्या १० दिवसांतच मला ऐतिहासिक वारसा लाभलेल्या नालंदाला भेट देण्याची संधी मिळाली. ही बाब मी भारताच्या विकासाच्या प्रवासाचे एक शुभ चिन्ह म्हणून मानतो. नालंदा ही एक ओळख आहे, सन्मान आहे. नालंदा एक मूल्य आहे, एक मंत्र आहे,




एक अभिमान आहे, एक कथा आहे. नालंदा हे एक असे सत्य आहे जे स्पष्टपणे सांगते की, अग्नीच्या ज्वाळांमध्ये पुस्तके जळू शकतात, परंतु अग्नीच्या ज्वाला ज्ञानाचा नाश करू शकत नाहीत. हे नवीन कॅम्पस भारताची नवी क्षमता जगाला दाखवेल. नालंदा दाखवून देईल की जी राष्ट्रे भक्कम मानवी मूल्यांवर आधारित असतात, त्यांना इतिहासाचे पुनरुज्जीवन करून चांगल्या भविष्याचा पाया घालणे जमते,’ असे मोदी म्हणाले.

या उद्घाटन सोहळ्याला परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, बिहारचे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर, मुख्यमंत्री नितीश कुमार आणि नालंदा विद्यापीठाचे कुलपती अरविंद पनगरिया उपस्थित होते. त्याचबरोबर ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, भूतान, ब्रुनेई, दारुसलाम, कंबोडिया, चीन, इंडोनेशिया, लाओस, मॉरिशस, म्यानमार, न्यूझीलंड, पोर्तुगाल, सिंगापूर, दक्षिण कोरिया, श्रीलंका आणि व्हिएतनाम यासह एकूण १७ देशांचे विदेशी राजदूतही उपस्थित होते.

नालंदा विद्यापीठाच्या कॅम्पसचे वैशिष्ट्य

नालंदाच्या प्राचीन अवशेषांच्या जागेजवळ विद्यापीठाचा नवीन परिसर बांधण्यात आला आहे. यात २ शैक्षणिक विभाग असून ४० वर्गखोल्या आहेत. येथे १,९०० मुलांसाठी बसण्याची व्यवस्था आहे. विद्यापीठात प्रत्येकी ३०० लोकांची क्षमता असलेली २ सभागृहे आहेत. याशिवाय हजारो लोकांची क्षमता असलेलं इंटरनॅशनल सेंटर आणि म्फी थिएटरही बांधण्यात आले आहे. सुमारे ४५५ एकर परिसरात पसरलेल्या नवीन कॅम्पसमध्ये १७५० कोटी रुपये खर्चून नवीन इमारती बांधण्यात आल्या आहेत.

### प्राचीन व्यवस्था अधिक प्रभावीपणे राबवली जाणार

‘नालंदा हे केवळ भारताच्या भूतकाळाशीच निगडीत नाही, तर जगातील आणि आशियातील अनेक देशांचा वारसा त्याच्याशी निगडीत आहे. आमच्या भागीदार देशांनीही नालंदा विद्यापीठाच्या पुनर्बांधणीत सहभाग घेतला आहे. या निमित्ताने मी भारताच्या सर्व मित्र देशांचेही अभिनंदन करतो. प्राचीन नालंदामध्ये मुलांचा प्रवेश त्यांच्या ओळख किंवा राष्ट्रीयत्वाच्या आधारावर केला जात नव्हता. प्रत्येक देशातून आणि प्रत्येक वर्गातील तरुण इथे यायचे. नालंदा विद्यापीठाच्या या नव्या कॅम्पसमध्ये पुन्हा तीच प्राचीन व्यवस्था अधिक प्रभावीपणे राबवली जाईल. ‘वसुधैव कुटुंबकम्’ याचे नालंदा हे सुंदर प्रतीक आहे,’ असेही मोदींनी अभिमानाने सांगितले.

# हज यात्रेकरुंवर सूर्याचा कोप !

## ५५०हून अधिक भाविकांचा उष्माघाताने मृत्यू २,००० यात्रेकरू रुग्णालयात दाखल

रियाध ।प्रतिनिधी

सौदी अरेबियातील हज यात्रेसाठी मोठ्या प्रमाणावर मुस्लिम बांधवांनी गर्दी केलीय. इस्लाम धर्मामध्ये हज यात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक मुस्लीम व्यक्तीने आयुष्यात एकदा तरी हजला जायला हवे असे म्हटले जाते. त्यामुळे जगभरातील लाखो मुस्लीम हज यात्रेसाठी मक्केला जातात. मात्र यावेळी हज यात्रेकरुंना भीषण गर्मीचा त्रास सहन करावा लागला आहे. हज यात्रेवेळी अनेकांचा उष्मघाताने बळी घेतला आहे. यामुळे सौदी अरेबियाने हज यात्रेची केलेली तयारी वादात अडकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सौदी अरबसह मध्य पूर्व आशियात उष्णतेची लाट पसरली आहे. दरम्यान, हज यात्रेवरही (मक्का, सौदी अरब) उष्णतेच्या लाटेचा गंभीर परिणाम झाला आहे. तब्बल ५५० हज यात्रेकरुंचा उष्मघाताने मृत्यू झाला आहे. मृतांमधील ३२३ भाविक हे इजिप्तचे



नागरिक आहेत. सौदी अरबमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितल्यानुसार, या भाविकांचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे, तर एका व्यक्तीचा गर्दीमुळे मृत्यू झाला आहे.

तापमानात वाढ

सौदीमधील हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हवामान बदलामुळे तिथल्या वातावरणावर गंभीर परिणाम होत आहे. तसेच हज यात्रेवरही त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. तिथले सरासरी तापमान ०.४ अंशांनी वाढ होत आहे. तर मक्का येथील ग्रँड मशिदीच्या परिसरात ५१.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, असे सौदी राष्ट्रीय हवामान विज्ञान केंद्राने म्हटले.

दरम्यान, हज व्यवस्थापन समितीने भाविकांना छत्रीचा वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच जास्तीत जास्त पाणी प्या, दुपारच्या वेळी बाहेर पडू नका, अशा सूचना देखील दिल्या आहेत. परंतु माऊंट अराफात येथे प्रार्थना आणि अनेक हज विधींसाठी यात्रेकरुंना दुपारच्या उन्हात थांबावे लागले होते. अनेक भाविक तासनतास तिथे उभे असल्यामुळे अनेकांची प्रकृती खालावली होती. यामुळे ५५० जणांचा मृत्यू झाला असून २००० जणांना रुग्णालयात दाखल केले आहे. त्याचबरोबर मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

# शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षाचा वर्धापन दिन साजरा

## परळी शहरवासीयांनी प्रत्येकाने एक झाड लावावे-भोजराज पालीवाल



परळी ।प्रतिनिधी

येथे शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेनेचा ५८ वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .परळी येथील बारा ज्योतिर्लिंगापैकी पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैजनाथ येथे त्यांचा आशीर्वाद घेऊन गरजवंत लोकांना फळे वाटप करण्यात आले . भगवान बाबा शाळेत लहान विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी म्हणून लहान विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. ऊणाची तीव्रता पाहता वृक्षारोपणाची खूप गरज आहे त्यामुळे वृक्षारोपण करण्यात आले परळी परळी शहरात ऊणाचीतीव्रता पाहता ४३ डिग्री पर्यंत ऊणाचे चटके पोळू लागले . परळी शहरातील रहवाशायानी प्रत्येकाने एक झाड लावायचा असा संकल्प घ्यावा आसे शिवसेना तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल यांनी प्रतेक रहवाशियाना विनंती केली आहे . शिवसेना वर्धापन दिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, शिवसेनेचे तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल, शिवसेना शहर प्रमुख राजेश विभुते, शिवसेनेचे उप तालुकाप्रमुख महेश केंद्रे, शिवसेनेचे माजी शहर प्रमुख नागनाथ पवार, युवा सेनेचे शहराधिकारी उमेश देवकर , शिवसेनेचे शाखाप्रमुख संतोष साखरे, विजय जाधव, राहुल उपाडे, तसेच भगवान बाबा शाळेचे मुख्याध्यापक दहिफळे सर, मुंडे सर व शाळेचा स्टॉप सगळ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनात १५ आरोग्यदायी पदार्थांचा समावेश फक्त कागदावरच

## मोफत गणवेश मिळणार कधी?!:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या १५ पाककृती निश्चित करण्यात आल्या असुन ३ संरचित आहार पद्धती नुसार व्हेजिटेबल पुलाव, नाचणी सत्त्व,अंडा पुलाव,तांदळाची खिचडी अशा पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची खिचडीपासुन सुटका होणार असुन निश्चित केलेल्या पाककृती मध्ये व्हेजिटेबल पुलाव,अंडा पुलाव,मसाले भात,मोड आलेली मटकीची उसळ, मटार पुलाव,गोड खिचडी,मुगडाळ, खिचडी,चवळी खिचडी,मुग,शेवगा,वरण भात,तांदळाची खीर,चणा पुलाव, नाचणीचे सत्त्व, सोयाबीन पुलाव,मोड आलेले कडधान्य आदी.१५ पदार्थांचा आस्वाद घेता येणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे मात्र वस्तुस्थिती वेगळीच असुन सद्यस्थितीत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीच्या स्वरूपात पोषण आहार दिला जात आहे. शालेय पोषण आहार पुरवठादार महाग वस्तुंची कमतरता




दाखवून स्वस्त असणा-या मटकी, हरभरा,वाटाणा, मसुर,मुगदाळ यांचाच शाळांना पुरवठा करण्यात येत आहे.केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारामध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करून आहाराचा दर्जा आणि पौष्टिकता वाढविणे, आहारात वैविध्य आणण्यासाठी पाककृती सुधारणा समिती नियुक्त करण्यात आली होती.

उन्हाळ्यात प्यायला पाणी नाही , परसबागेतील भाजीपाला आहारात मिळणार कधी??

शिक्षण विभागाकडून पात्र शाळांमध्ये निर्माण केल्या जात असलेल्या परसबागातुन उत्पादीत भाजीपाला,फळे यांचा समावेश विद्यार्थ्यांच्या आहारात होत असल्याने विद्यार्थ्यांना ताजा,सकस आहार मिळण्यास मदत होत असल्याचे नमूद केले आहे. मात्र जिल्ह्यातील किती शाळांमध्ये परसबाग आहे आणि मुख्य म्हणजे उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना प्यायला पाणी नाही आणि परसबाग कशी जगवायची असा प्रश्न शाळेतील शिक्षकांनी उपस्थित केला असुन केवळ कागदावर छान असणारी योजना वास्तवात मात्र उतरताना दिसत नाही.

मोफत गणवेश आणि बुट सॉक्स मिळणार कधी???

राज्यात एक राज्य एक गणवेश योजनेची अंमलबजावणी २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येत असून या अंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन यामध्ये एक नियमित स्वरुपाचा गणवेश तर स्काऊट व गाईड या विषयासाठी दुसरा गणवेश असणार आहे.महिला आर्थिक विकास महामंडळाकडून गणवेशाच्या शिलाईचे काम सुरू असुन लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येत असली तरी नेमका गणवेश मिळणार कधी?? हा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे.गणवेशा बरोबरच मुलांना बुट आणि सॉक्स सुद्धा मिळाले नाहीत.गतवर्षी एका विद्यार्थ्यासाठी एक बुट जोडी आणि दोन सॉक्स जोड यासाठी १७० रूपये निधी देण्यात आला होता.यावरुन कोणत्या दर्जाचे साहित्य मिळत असेल याची कल्पनाच न केलेली बरी.



## सामाजिक जानीवेतून माणुसकीचे मूल्य संवर्धित

बीड ।प्रतिनिधी

मानवाने जिवन जगताना मैत्री पुर्ण जिवन जगावे. आपले जिवन इतरांच्या कामी आणि मदती साठी कसे येईल याचा विचार करत राहवे. याच उदात्त हेतूच्या संकल्पनेतून सर्पराज्ञी तील मुक्या जनावरांना ड तेजस वडमारे यांच्या वाढदिवसानिमित्त फळांचे वाटप करून तसेच आर्थिक मदत करून माणुसकीचे मूल्य संवर्धित केल्याचा आत्मिक आनंद आहे. आसे प्रतिपादन ड राजेश शिंदे यांनी व्यक्त केले.

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात असलेल्या तगडगाव येथील सिध्दार्थ आणि सृष्टी सोनवणे या दाम्पत्याच्या सर्पराज्ञी प्रकल्पात रवीवार (दी.१६) रोजी ड तेजस वडमारे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी ड राजेश शिंदे बोलत होते यावेळी पत्रकार सुनील डोंगरे यांच्या सह आदींची उपस्थिती होती. पूढे बोलताना ड राजेश शिंदे म्हणाले की, सर्पराज्ञीत मुक्या जीवांवर उपचार करून त्यांना निसर्गाच्या सान्निध्यात सोडले जाते. समाजात चांगले कामे करणाऱ्या व्यक्ती मोजक्या आहेत त्या पैकी सिध्दार्थ व सृष्टी सोनवणे यांचा उल्लेख करावा लागेल असे मत ड राजेश शिंदे यांनी व्यक्त केले. या वेळी पत्रकार सुनील डोंगरे म्हणाले सामजिक चळवळीत आणि धम्म चळवळीत ड तेजस वडमारे यांचे कार्य दखलपात्र आणि कौतुकास्पद आहे, बुद्धाने सांगितलेल्या प्रज्ञा,शील, करुणा अंगी रुजवत ड तेजस वडमारे अंजली वडमारे हे दांपत्य आपले योगदान प्रमाणिक पणे देत आले आहेत. आज सर्पराज्ञीत आर्थिक मदत करत समाजापुढे आदर्श निर्माण करून दिला आहे आशा भावना पत्रकार सुनील डोंगरे यांनी व्यक्त केली.

## कै.भाऊसाहेब नबाजी पवार यांचे निधन

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील चोभानिमगांव(पवार वस्ती)येथील कै.भाऊसाहेब नबाजी पवार(वय ६१)यांचे खाजगी दवाखान्यात उपचारादरम्यान अल्पशा आजाराने बुधवारी निधन झाले. यांच्यावर चोभानिमगांव (पवार वस्ती)येथे त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.व त्यांच्या दशक्रिया विधी शुक्रवार दिनांक २१/०६/२०२४रोजी सकाळी ८वाजता नांदा ता आष्टी जि बीड येथे होणार आहे.प्रवचनकार ह.भ.प.मच्छिंद्र दादा राऊत यांचे प्रवचन होईल. त्यांच्यापाठीमागे जयश्री



भाऊसाहेब पवार(पत्नी),महावीर भाऊसाहेब पवार(मुलगा),प्रियंका महावीर पवार(सुन)व एक मुलगा,मुली,सुन,नातवंडे असा मोठा परिवार आहे.




## भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या २६ वर्धापन दिनानिमित्त पुनंदगाव येथे वृक्षारोपण संपन्न

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पुनंदगाव याठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या वतीने वृक्षारोपण केले यावेळी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके व माजलगाव तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड यांनी भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या २६ वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन बीड जिल्ह्यात ठेवण्यात आलेले होते तर माजलगाव मध्ये पुनंदगाव या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले या वेळी तेथील उपसरपंच मिसाळ साहेब ग्रामसेवक शिंदे साहेब जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळुंके समितीचे तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड पत्रकार अमर साळवे पत्रकार पृथ्वीराज निर्माण पत्रकार विजय डावरे पत्रकार राजरतन डोंगरे पत्रकार दर्शन डोंगरे संजय गायकवाड,शेखर सांवत,कर्णराज कुरे,सुमित कुंभार,कटारे सर,सहशिक्षक व पुनदगाव चे गावकरी यांची प्रमुख उपस्थित होती

# कर्तव्यात कसूर? करणारे बीडीओं? यांचा चुकार ग्रामसेवकांच्या डोक्यावर हात?

### केज तालुक्यात बायोमेट्रिक हजेरी प्रणालीला मुहुर्त कधी ?
### ग्रामसेवकांची मनमानी, ग्रामस्थ हैराण !
### अक्षय गोटेगावकर यांची कारवाईची मागणी!

**केज ।प्रतिनिधी**

**गोटेगावसह केज तालुक्यांतील ग्रामपंचायतींमध्ये बायोमेट्रिक प्रणाली बसविण्याचे आदेश काढून, कार्यवाही केल्याचा अहवाल सादर करण्याच्या सूचना गटविकास अधिकाऱ्यांनी दिल्या होत्या?मात्र, अनेक ग्रामपंचायतींनी बायोमेट्रिक प्रणाली बसविली नसून, ग्रामसेवकांनी गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचे केज तालुक्यात दिसून येत आहे.**

**केज तालुक्यातील अनेक ग्रामसेवक कामाच्या ठिकाणी हजर राहत नसल्याचे तसेच आठवडा आठवडा गायब असल्याचे चित्र केज तालुक्यात पाहावयास मिळते. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचा त्यांच्यावर वचक आहे की नाही असा प्रश्न ग्रामस्थांना पडत आहे. याबाबत वरिष्ठांकडे तक्रारी करूनही कुठलीही कारवाई झाली नाही. ग्रामसेवक अनेक दिवस कामकाजस्थळी हजर राहत नसल्याने नागरिकांची कामे मोठ्या प्रमाणावर खोळंबली आहेत. त्यामुळे अनेक ग्रामपंचायतीचा कारभार रामभरोसे चालला असून, याबाबत वरिष्ठ अधिकारी कधी लक्ष घालणार, असा सवाल उपस्थित होत आहे.**

मागील काही महिन्यापूर्वी अनेक ग्रामसेवक कामाचे गाव सोडून इतर गावात कामकाज करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सम्यक विद्यार्थी आंदोलन व ज्ञानमाता माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समूह महाराष्ट्र राज्याचे नेते अक्षय गोटेगावकर यांनी केज तालुक्यातील शासकीय कामाचा सावळागोंधळ उघड केला होता.एखादा ग्रामसेवक सज्जाचे गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी प्रोसिडिंग बुकवर किंवा निधी कसा देवाण-घेवाण करू शकतो, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची गरज होती. मात्र नोटीस काढूनही ग्रामसेवक वरिष्ठांचे एकच नसतील तर, वरिष्ठांचा धाक उरला आहे की नाही, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते अक्षय गोटेगावकर यांनी याबाबत तक्रार करत तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीत बायोमेट्रिक प्रणालीवर प्रश्न उपस्थित करून ती



बसविण्याची मागणी केली होती. त्यावर गटविकास अधिकाऱ्यांनी लेखी आदेश ही काढला होता. बायोमेट्रिक प्रणाली बसवून, तसा कार्यवाही अहवाल सादर करण्याचे सांगितले होते. मात्र, अनेक ग्रामपंचायतींनी बायोमेट्रिक प्रणाली बसविलीच नाही. ग्रामसेवकांनी या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचे दिसून येत आहे. या ग्रामसेवकांवर वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करतात, याकडे केज तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### ग्रामसेवकांवर कारवाई करा तक्रार केल्यानंतर वरिष्ठ

अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीत बायोमेट्रिक प्रणाली बसविणे बंधनकारक केले आहे. मात्र, सद्यस्थितीत अनेक ग्रामपंचायतीते बायोमेट्रिक प्रणाली बसविण्यात आलेली नाही. वरिष्ठांचा आदेश न मानणाऱ्या ग्रामसेवकांवर शिस्तभंगासह प्रचलित कायद्यानुसार फौजदारी खटला भरून कारवाई करण्याची मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलन व ज्ञानमाता माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समूह महाराष्ट्र राज्याचे नेते अक्षय गोटेगावकर यांनी केली आहे

### बायोमेट्रिक प्रणालीमुळे उपस्थितिचे बंधन

अनेक ग्रामसेवक कामकाजाच्या स्थळी हजर राहत नाहीत. मात्र शासन दप्तरी हजर असल्याचे दाखविले जाते. त्यामुळे शासनाची फसवणूक होऊन नागरिकांची कामे खोळंबतात. बायोमेट्रिक प्रणालीद्वारे ग्रामसेवकांनी कामाची हजेरी लावणे बंधनकारक असते. त्यामुळे त्यांच्यावर शासकीय नियंत्रण राहील, शिवाय ते उलटतपासणी साठी सोपे होते असे गोटेगावकरांनी सांगितले.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,बीड

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, बीड
तेलगांव नाका, आदित्य कॉलेज समोर, नाळवंडी रोड, बीड-४३११२२
फोन नं. ०२४४२-२२२२३६
E-Mail : eemjpbeed@gmail.com

### आवेदन सुचना

कामाचे नाव : भाडे तत्वावर वाहन लावणे बाबत

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, बीड हे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडुन मंजुरी असलेले पंजीकृत परवाना प्राप्त वाहन धारकाकडून जीवन प्राधिकरण विभाग, बीड या कार्यालयासाठी शासकीय कामाकरिता वाहन भाडे तत्वावर लावण्यात येणारे वाहन हे सन २०२० पुर्वीचे नसावे. भाडे तत्वावर घेण्यासाठी मोहोरबंद आवेदन दि.०६.०७.२०२४ रोजी दुपारी १३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | वाहनाचा प्रकार व संख्या |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,बीड | Innova (AC) (1) |
| २ | उप विभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग,बीड | Scorpio/Bolero(AC) (1) |
| ३ | उप विभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, बीड क्र.२ | Scorpio/Bolero(AC) (1) |
| ४ | उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग, अंबाजोगाई | Scorpio/Bolero(AC) (1) |

सदरील कोऱ्या निविदेची फीस रू.१०००/- (अक्षरी एक हजार रूपये व वस्तु व सेवा कर १८ टक्के) असे एकूण ११८०/- मात्र) परत न मिळणारी रक्कम ठेवण्यात आली आहे. कोऱ्या आवेदन विक्री दि.२०.०६.२०२४ पासुन दि.२६.०६.२०२४ पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून राहील. आवेद पत्राच्या अर्हता अटी व सविस्तर माहिती या कार्यालयात उपलब्ध आहे.

स्वाक्षरित/-
के.वी. चिवरे
कार्यकारी अभियंता


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT